# उमेदवारांना इशारा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या निदर्शनास आले आहे की, आयोगाच्या परीक्षांना बसणाऱ्या व शासन सेवेत येऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांची दिशाभूल करण्याचा व त्यांना खोटी आमिषे दाखवून लुबाडण्याचा प्रयत्न काही समाजविघातक व्यक्तींकडून काही वेळा केला जात असावा. नोकरीच्या शोधात असलेले काही उमेदवार अशा प्रलोभनाला बळी पडत असावेत. अशा समाजविघातक व्यक्ती, उमेदवारांची निवड केवळ गुणवत्तेवर झाली असतांना / होणार असतांनादेखील सदर निवड त्यांच्यामुळे झाली / होईल असे सांगून उमेदवारांना लुबाडण्याचा प्रयत्न करीत असावेत. आयोगाच्या विविध परीक्षांना बसणा-या सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी अशा प्रलोभनांपासून व फसवणुकीपासून सावध रहावे. उमेदवारांनी स्वत:ची क्षमता, मेहनत व अभ्यास यावर भरवसा ठेवावा. आयोगाकडून केवळ गुणवत्तेच्या आधारेच उमेदवारांची निवड केली जाते व त्यांची शासनाकडे शिफारस करण्यात येते, याची खात्री बाळगावी. आयोगाकडून, विहित केलेले परीक्षा शुल्क वगळता अन्य कोणतीही रक्कम कोणाही द्वारे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षही स्विकारली जात नाही. त्यामुळे जर कोणीही व्यक्ती काही आश्वासन देऊन किंवा प्रलोभन दाखवून पैशाची मागणी करत असेल तर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी दूरध्वनी क्रमांक ०२२-२४९२१२१२ किंवा टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क साधावा.

**दि. १० नोव्हेंबर, २०१४**

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**